फाळकूटदादांचे पेव, गुन्हेगारीला चेव

कोल्हापूर : वैभव गोंधळी

शहरातील काही विशिष्ट भाग आणि उपनगरांमध्ये फाळकूटदादांचे पेव फुटले आहे. पोलिसांकडून त्यांच्याकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे शहरात गुन्हेगारीला चेव चढत आहे. वर्चस्ववादांतून अनेक ठिकाणी संघर्षाच्या घटनाही घडल्या आहेत. गर्दीच्या ठिकाणी भरदिवसा मुडदे पाडण्यापर्यंत या दादांची मजल गेली आहे. अशा या वाढत्या व समाजाला घातक अशा गुन्हेगारीवर वेळीच अंकुश ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. तशी मागणीही आता जनतेतून पोलीस प्रशासनाकडे होत आहे.

कोल्हापूर हे सुरक्षित शहर म्हणून ओळखले जाते. अगदी रात्री-अपरात्रीही तरुणी व महिला बिनधास्तपणे शहरात वावरत असतात. मात्र, अलीकडील काळात शहरातील काही परिसर आणि उपनगरे असुरक्षित बनू लागली आहेत. या परिसरात फाळकूटदादांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र पोलिसांनी याकडे कानाडोळा केल्यामुळे त्यांची दहशत वेगाने पसरत आहे.

परिसरातील चौकाचौकात या दादांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. मुख्य म्हणजे त्यांची दहशत, राजकीय लोकांत उठबस, अल्पावधीत अवैध मार्गाने मिळवलेली माया, रुबाबदार वागणे याकडे परिसरातील नवयुवक आकर्षला जात आहे. परिणामी ते दादांचे समर्थक बनत आहेत. सुरुवातीला 'फाळकूट' म्हणून पोलिसांनी दुर्लक्ष केलेले हे दादा सध्या पोलिसांसह संपूर्ण समाज व्यवस्थेला आज वेठीस धरत आहेत.

समाजकटकांना वेळीच आवर घालण्याची गरज

नवीन पोलीस ठाणी व मनुष्यबळ गरजेचे

शहराचा झपाट्याने विस्तार होत आहे. या नव्याने निर्माण होत असलेल्या उपनगरांमध्ये सातत्याने गुन्हेगारीचा आलेख चढताच आहे. त्यामुळे अशा परिसरांमध्ये नवीन पोलीस ठाण्यांची गरज निर्माण झाली आहे. त्याचबरोबर सध्याच्या पोलीस ठाण्यांना आवश्यक ते मनुष्यबळ पुरवणेही आवश्यक आहे. यापूर्वी रिंगरोडवरील आर. के. नगर, पाचगाव, मोरेवाडी, कळंबा, फुलेवाडी रिंगरोड आदी परिसरासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे मागणीचा प्रस्ताव जिल्हा पोलीस दलाकडून तयार करण्यात आला होता. आता वेगाने त्यासाठी प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. तरच या परिसरातील गुन्ह्यांवर अंकुश ठेवण्यास मदत मिळणार आहे.

शहरातील पोलीस यंत्रणा

- पोलीस ठाणे संख्या - ४
- अपर पोलीस अधीक्षक कार्यालय - १
- पोलीस उपअधीक्षक कार्यालय - १
- शहर वाहतूक नियंत्रण शाखा - १

'या' परिसरात दहशत

मध्यवर्ती बसस्थानक, सदर बझार, कावळा नाका, कनाननगर, रेल्वेस्टेशन, टाकाळा, राजेंद्रनगर, जवाहरनगर, सायबर चौक, यादवनगर, वारेवसाहत, रंकाळा चौपाटी, टिंबर मार्केट, हॉकी स्टेडियम, फुलेवाडी बोंद्रे-नगर, लक्षतीर्थ वसाहत

हॉटेल मालक, व्यावसायिक बेजार ...

शहर आणि उपनगरांतील फाळकूटदादांचा सर्वाधिक त्रास हॉटेल मालक, तसेच व्यावसायिकांना सहन करावा लागतो. फुकट वस्तू, तसेच जेवणासाठी धमक्या, शिवीगाळ, मारहाण यांना सामोरे जावे लागते. त्याच परिसरात व्यवसाय करावयाचा असल्याने हे व्यावसायिक पोलिसांकडे तक्रार करू शकत नाहीत. जर कधी तक्रार केलीच, तर त्याची गांभीर्याने दखल घेतली जाईल, याची शाश्वती नसल्याने तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो. मागील काही महिन्यांपूर्वी अशाच कारणातून मारहाणीत उद्यमनगर परिसरात एका बेकरी व्यावसायिकाला आपला जीव गमवावा लागला. तर एस.टी स्टॅण्ड रेल्वे स्टेशन आदी परिसरात फाळकूटदादांची दहशत आहे.

हवे सक्षम गुंडाविरोधी पथक

स्थानिक पोलीस ठाण्यांकडून हद्दीतील दादांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे या दादांची दहशत अधिक वाढते. अशा गुन्हेगारांची दहशत मोडीत काढण्यासाठी अधीक्षक कार्यालयाच्या पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. सक्षम गुंडाविरोधी पथक तयार करून सराईतांची पाळेमुळे खणून काढणे आवश्यक आहे. तरच शहरातील ही संघटित गुन्हेगारी आटोक्यात येईल.

'या' मुलांचे प्रबोधन हवे

भागाभागातील भाई-दादांच्या मागे शेकडो तरुणांचा जथ्था असतो. या तरुणांसाठी हे दादा म्हणजे 'रियल हीरो' असतात. यामध्ये बहुतांश अल्पवयीन मुलांचा समावेश असतो. त्यामुळे पोलिसांनी कारवाई करण्यापेक्षा पालकांनीच आपल्या मुलांना वेळीच योग्य दिशा दाखवणे गरजेचे आहे. तसेच त्यांचे समुपदेशन करून त्यांना अशा गुन्हेगारी लोकांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करायला हवे.

बेशिस्त वाहतूक सुधारणार कोण?

कोल्हापूर : निखिल गोखले

वाहनधारकांकडून सातत्याने होणारा नियमभंग, शहरातील अपुरे पार्किंग आणि वाहतूक प्रशासनाची केवळ जानेवारी ते मार्च काळातच नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी अशा विविध कारणांमुळे शहरातील वाहतूक शिस्तीचा बोजवारा उडाला आहे. वर्षभरात १७ हजार प्रकरणांत कोट्यवधींचा दंड बेशिस्त वाहनधारकांना ठोठावण्यात आला आहे. तर प्रशासनानेही मार्गदर्शक तत्त्वे पाळावीत, अशी मागणी वाहनधारकांतून होत आहे.

कोल्हापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येबरोबरच शहर परिसरातील वाहनांची संख्याही लाखांच्या घरात पोहोचली आहे. त्यातच करवीर निवासिनी अंबाबाईला येणारे लाखो भाविक, सुट्ट्यांमध्ये येणारे पर्यटक यामुळे शहरात बाराही महिने वाहतूक शिस्तीचा बोजवारा उडालेला असतो. त्यातच तोडकी पार्किंग व्यवस्था, महत्त्वाच्या रस्त्यांवरील वाढलेली अतिक्रमणे, तसेच वाहनचालकांकडून सातत्याने होणारे नियमांचे उल्लंघन अशा कारणांमुळे शहरातील वाहतुकीची दुर्दशा होत आहे. शहरात वर्ष २०२३-२४ कालावधीत १७ हजार ३१६ बेशिस्त वाहतूक प्रकरणे उघडकीत आली आहेत. तर वाहनचालकांच्या मते, याला केवळ आम्हीच जबाबदार नाही, तर मनपा प्रशासनाच्या अपुऱ्या सुविधा, मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करता केलेली वाहतूक पोलिस प्रशासनाची कारवाई हेही घटक जबाबदार आहेत.

शहरात वर्षभरात १७ हजार प्रकरणे

वाहनधारकांची जबाबदारी

* वाहतूक नियमांचे पालन करून वाहन चालवणे
* पार्किंगच्या ठिकाणीच वाहन
* अडथळा होईल अशाप्रकारे वाहन पार्क करू नका
* शक्य होईल तितके सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा
* महत्त्वाच्या रस्ते खोदाईची पूर्वकल्पना वाहतूक विभागाला द्या
* अतिक्रमणामुळे होणारी ट्रॅफिक अडचण पाहता कारवाई करा
* विनापार्किंग इमारतींना परवानगी नको
* शहरातील वन वे टू वे रस्त्यांचा पुनर्विचार करावा
* शहर वाहतूक पोलिसांची जबाबदारी
* चुकीच्या ठिकाणी वाहन पार्किंगला मज्जाव केला जावा
* बेशिस्त वाहन टोविंग करताना वाहन उचलून नेण्यापेक्षा वाहनचालकाकडून जागेवर दंड आकारावा
* वाहतूक अधिनियम २०१७ नुसार चुकीच्या ठिकाणी वाहन पार्क झाले असल्याचे लाऊड स्पीकरद्वारे घोषणा करावी
* वाहनांवर कारवाई करताना अंमलदार, कंत्राटदार यांनी सौजन्याने वागावे
* टोविंग वाहनासोबत जबाबदार अधिकारी हवा

वाहतूक दंड प्रकरणांची संख्या

(१ एप्रिल २३ ते ३१ मार्च २४)

वाहन चालवताना मोबाईल वापर	838
केस, सिग्नल जंप	511
मद्यप्राशन करून गाडी चालवणे	125
बेकायदेशीर नंबर प्लेट	65
गडद काचेचा वापर	135
बंदी क्षेत्रात हॉर्न देणे	149
रहदारीस अडथळा	3937
प्रवेश बंद मार्गातून वाहन नेणे	1189
लायसन न बाळगणे	3379
पोलीस आदेश उल्लंघन	1503

एकूण ३४ प्रकारांच्या केसमध्ये **1,18,65,950**

वाहतूक शिस्तीसाठी प्रयत्न

शहरात वाहतूक कोंडी न होता ती सुरळीत चालावी, तसेच बेशिस्त वाहतुकीमुळे कोणताही अपघात होऊ नये, यासाठी विभागामार्फत नियमावलीचे काटेकोर पालन केले जाते. कोणत्याही नागरिकाला विनाकारण त्रास देणे या मागचा उद्देश नाही.

(नंदकुमार मोरे, पोलीस निरीक्षक, शहर वातूक शाखा)

ग्राहक पंचायतकडे तक्रार : ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणाऱ्या महानगर ग्राहक पंचायतकडे वर्षभरात शेकडो वाहनचालकांकडून सातत्याने तक्रारी होत आहेत. यात खासगी कंपनीच्या टारगेटप्रमाणे केवळ जानेवारी ते मार्च काळातच वाहतूक पोलिसांची कारवाई का होते, टो-व्हॅनची अनेकदा मनमानी, वन वे वर खोदाई केली असेल तर दुसऱ्या मार्गावर कारवाई का? असे प्रश्न विचारले जात आहेत, अशी माहिती अध्यक्ष कमलाकर बुरांडे यांनी दिली. नुकतेच ग्राहक पंचायततर्फे याबाबत वाहतूक प्रशासनाला निवेदनही दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जोतिबा चैत्र यात्रेची १० रोजी नियोजन आढावा बैठक

जोतिबा : प्रतिनिधी

श्रीक्षेत्र जोतिबा डोंगर येथील चैत्र पौर्णिमेची यात्रा २३ एप्रिल रोजी संपन्न होत आहे. या निमित्ताने यात्रा नियोजनाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी जोतिबा डोंगर येथील जोतिबा पोलीस चौकीमध्ये पन्हाळा-शाहूवाडीचे उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली यात्रा नियोजनाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. १० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस प्रमुख यांच्या उपस्थितीत यात्रा नियोजनाच्या कामांचा आढावा बैठक होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



जोतिबा : चैत्र यात्रा आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना पन्हाळा-शाहूवाडीचे उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे. सोबत गटविकास अधिकारी सोनाली माडकर, अपर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई, उपविभागीय पोलिस अधिकारी अप्पासाहेब पवार, तहसीलदार माधवी शिंदे, वाहतूक पो. नि. नंदकुमार मोरे.

श्री जोतिबा डोंगर येथील चैत्र पौर्णिमेची यात्रा दि. २३ एप्रिल रोजी होत आहे. यात्रेसाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश आदी राज्यांतून ८ ते ९ लाखांहून अधिक भाविक डोंगरावर येतात. त्यासाठी यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी, यात्रा काळात भाविक आणि ग्रामस्थांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या आणि पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर पन्हाळा- शाहूवाडीचे उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे यांनी जिल्हा प्रशासनाच्या सर्व विभागांतील विभागप्रमुखांकडून कामांचा आढावा घेतला. लोकसभा निवडणूक आणि जोतिबा देवाची चैत्र यात्रा एकाच वेळी होत असल्याने त्याचे नियोजन योग्य पद्धतीने करण्यासाठी, लोकसभेची निवडणूक जाहीर झाली असली तरी जोतिबा चैत्र पौर्णिमा यात्रेच्या तयारीसाठी कोणत्याही प्रकारे खंड पडू दिला जाणार नाही, त्यापद्धतीने तयारी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या दहा एप्रिलला जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीसप्रमुख यांच्या उपस्थितीत यात्रा नियोजनाच्या कामांची आढावा बैठक होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आढावा बैठकीवेळी अपर पोलिस अधीक्षक जयश्री देसाई, पन्हाळाच्या तहसीलदार माधवी शिंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी अप्पासाहेब पवार, गटविकास अधिकारी सोनाली माडकर, जोतिबा मंदिराचे व्यवस्थापक धैर्यशील तिवले, वाहतूक पोलीस निरीक्षक नंदकुमार मोरे, कोडोलीचे उपनिरीक्षक नामदेव दांडगे, मनोज कदम, मंडल अधिकारी वासंती पाटील, तलाठी रमेश वळीवडेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

करवीरमध्ये सहाशे शस्त्रे जमा

कोगे : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील १ हजार ६०६ जणांना शस्त्र जमा करण्याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये करवीर तालुक्यातील ६०० परवानाधारक आहेत. राजकीय पक्षांचे जवळपास ७० टक्के पदाधिकारी, कार्यकर्ते आहेत.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

2nd call Tender Notice

MSETCL invites online bids (SRM E-Tender) from **Registered Contractors** on Mahatransco SRM E-Tendering Website https://srmetender.mahatransco.in for the following works.

Sr. No.	RFx No. & Description of Work	Due date & Time (Hrs) for online submission of Tender
1	RFX No. 7000030430. Tender No. EE/ 500 KV/ HVDC TL (O&M)/ DN/ RNGR/ Tech/ T-04/2023-24	
	2nd call for Hiring of Tata Sumo/Mahindra Bolero vehicle along with driver with fuel for 500kV HVDC TL(O&M) Sub-Division, Padghe for F.Y. 2024-25	Download of tender documents Date : 06.04.2024 to 12.04.2024 up to 23:59 Hrs.

Estimated Cost (Rs.)	EMD (Rs.)	Tender Fee (Rs.)	Closing Date	Techno Commercial bid opening Date
5,99,878.00/- (Inclusive of taxes)	5,998.78/-	Rs.590.00/ - (Rs. 500+ 18% GST)	12.04.2024 at 23:59 hrs.	13.04.2024 at 11:00 Hrs. (If Possible)

Note :- All new interested contractors are mandated to get registered on website https://srmetender.mahatransco.in for new vendor registration.

Contact Person: The Assistant Engineer (O), 7775934906.
For further details visit our website http://mahatransco.in/

1. Relevant portions of the Tender which the tenderer has to fill online would be available on aforesaid website.
2. Tender documents can be downloaded online from aforesaid website.
3. Eligible contractor agencies should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

Sd/-
Executive Engineer
500KV HVDC TL (O&M) Division, Rajgurunagar

पान १ वरून

३० लाख नोकऱ्या, एमएसपीचा कायदा

काँग्रेसने 'न्यायपत्र' असे नाव दिले आहे. यामध्ये 'हिस्सेदारी न्याय', 'शेतकरी न्याय', 'नारी न्याय', 'श्रमिक न्याय', 'युवा न्याय' 'संविधान न्याय', 'आर्थिक न्याय', 'राज्य न्याय' , 'संरक्षण न्याय' आणि 'पर्यावरण न्याय' अशा दहा न्याय मुद्द्यांचा उल्लेख आहे. प्रत्येक न्यायअंतर्गत पाच गॅरंटीचे आश्वासन देण्यात आले आहे. यापूर्वी पक्षाने पाच न्याय आणि २५ गॅरंटी जनतेसमोर ठेवल्या होत्या. युवा न्यायअंतर्गत ३० लाख सरकारी नोकऱ्या, पदवीधर युवकांना वार्षिक एक लाख रुपये वेतनाची अॅप्रेंटिसशीप देण्यात येणार आहे. हिस्सेदारी न्यायअंतर्गत जातनिहाय जनगणना करण्याचे आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. शेतकरी न्यायअंतर्गत किमान हमीभावाची गॅरंटी देणारा कायदा करण्याचे, पीक कर्जमाफीसाठी आयोग स्थापन करण्याचे आणि शेतीशी संबंधित बाबींवरील जीएसटी हटवण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. श्रमिक न्याय अंतर्गत प्रतिदिन किमान ४०० रुपये मजुरी, शहरी रोजगार गॅरंटी, मजुरांना आरोग्याचा अधिकार देण्यात येईल. नारी न्यायअंतर्गत गरीब कुटुंबातील महिलांना दरवर्षी एक लाख रुपये देण्यासह अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. काँग्रेसने एक राष्ट्र एक निवडणुकीची संकल्पना फेटाळून लावत संविधान न्यायअंतर्गत संसदीय लोकशाहीनुसार निवडणूक घेण्याचे आश्वासन दिले. काँग्रेसने नव्या शिक्षण धोरणात सुधार करण्याचे आश्वासन देत खासगी शाळांच्या फीसमध्ये समानता, पारदर्शकपणा आणणार असल्याचे सांगितले. काँग्रेस जाहीरनाम्याद्वारे पुढील १० वर्षांत देशाचा विकास दर दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. काँग्रेसकडून शनिवारी जयपूर आणि हैदराबादमध्ये जाहीरनाम्याशी संबंधित सभांचे आयोजन करण्यात आले आहे. जयपूरमधील सभेला सोनिया, खरगे, राहुल आणि प्रियंका संबोधित करतील. तर हैदराबादमधील सभेला राहुल हेच एकटे जातील.

स्वस्त कर्जासाठी अजूनही प्रतीक्षाच

प्रकारच्या कर्जावरील व्याजदर वाढवतात जसे की गृह, वैयक्तिक, वाहन इत्यादी. त्याचप्रमाणे रेपो दर कमी झाल्यावर बँका कर्जावरील व्याजदर कमी करतात. जागतिक अनिश्चिततेच्या काळात महागाई चार टक्क्यांपर्यंत खाली आणणे आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा दृष्टिकोन कायम ठेवत रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये कोणताही बदल केला नाही. अशा परिस्थितीत सध्याचा मासिक किमान हप्ता म्हणजेच ईएमआय आहे तोच राहणार आहे. परिणामी आता सर्वसामान्यांना स्वस्त कर्जासाठी आणखी काही काळ जास्त प्रतीक्षा करावी लागणार आहे.

आंबेडकर जयंतीनिमित्त मोफत टॅटू

मुरगूड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त मुरगूडात स्टार टॅटू स्टुडिओद्वारे आर्टिस्ट सतीश शिंदे यांनी १४ एप्रिलपर्यंत मोफत टॅटू काढून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला आहे. उपक्रमाबद्दल कॉ. बबन बारदेस्कर, भिकाजी कांबळे, तानाजी कांबळे, मोहन कांबळे व नगर परिषदेचे सफाई कर्मचारी यांनी टॅटू स्टार आर्टिस्ट सतीश शिंदे यांचा सत्कार केला.

घरा घरात... मना मनात...
ऑफर पुण्य नगरी ऑफर
APPOINTMENT
ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.
आता सवलतीच्या दरात

पश्चिम महाराष्ट्र	रु. ५०००/-
मुंबईसह कोकण विभाग	रु. ५०००/-
उत्तर महाराष्ट्र	रु. ५०००/-
मराठवाडा विभाग	रु. ५०००/-
विदर्भ	रु. ५०००/-
कोणतेही दोन विभाग	रु. ७५००/-
कोणतेही तीन विभाग	रु. ११५००/-
कोणतेही चार विभाग	रु. १५५००/-
संपुर्ण महाराष्ट्र	रु. १९५००/-

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२३ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा
18002081019
E-mail:customercare@sapp.in

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.-२९, उपभूखंड क्र. १, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा-४१५ ००२

(नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषत: कर्जदार व हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१	अमित अशोक कदम (कर्जदार), मंगला अशोक कदम (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ०००००१२९५९०८	फ्लॅट क्र. एफ-३, पहिला मजला, इमारतीचे नाव ''नीलम कॉम्प्लेक्स'', सीटीएस क्र. ४१३ए/१, सातारा शहर, पेठ, मंगळवार, तालुका व जिल्हा सातारा.	रु. २२,१९,७६१/- दि. २८ मार्च २०२४	रु. १६,७८,९५०/- / रु. १,६७,९००/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२४ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोब टेक** यांचे संकेतस्थळ (यूआरएल लिंक - https://BestAauctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क **दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत** अदा करावे, त्यास ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस/डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.-२९, उपभूखंड क्र. १, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा-४१५ ००२** येथे **२३ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.-२९, उपभूखंड क्र. १, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा-४१५ ००२** येथे **दि. २३ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत बँकेचा/शेड्युल्ड बँकेचा आणि **''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव''** यांच्या नावे आणि **सातारा** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड- ९९२०८०७३००** किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : ०६ एप्रिल २०२४
स्थळ : सातारा

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड